११७



पदोन्नतीच्या वेळी वेतननिश्चिती करता विकल्प देणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
वित्त विभाग
परिपत्रक क्रमांक वेतन-1095/सीआर-83/95/सेवा-3,
मंत्रालय, मुंबई 400 032, दिनांक 19 डिसेंबर 1995.

पहा :- (1) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. पीएवाय-1092/सीआर-1100(एक)/एसईआर-3, दिनांक 6 नोव्हेंबर 1984.

(2) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक पीएवाय-1092/सीआर-1100(दोन), दिनांक 6 नोव्हेंबर 1984.

(3) शासन निर्णय, क्रमांक वेतन-1085/सीआर-909/सेवा-3, दिनांक 15 ऑक्टोबर 1985.

(4) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक वेपूर-1289/42/सेवा-10, दिनांक 29 मे 1989.

(5) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्रमांक वेपूर-1289/99/सेवा-10, दिनांक 6 जुलै 1939.

## प रि प त्र क

वरील क्रमांक (1) व (2) येथील वित्त विभागाच्या दिनांक 6 नोव्हेंबर 1984 च्या शासन निर्णयांमधील तरतुदीअन्वये पदोन्नतीनंतर वेतनाची निश्चिती महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम, 1981 मधील नियम 11(1)(ए) खाली अथवा खालच्या पदावर वेतनवाढ देय झाल्यानंतर करून घेण्यासंबंधीचा विकल्प शासकीय कर्मचा-यांना देता येतो. या आदेशान्वये 1 मे 1981 किंवा त्यानंतर म्हणजे दिनांक 6 नोव्हेंबर 1984 पर्यन्त पदोन्नत झालेल्या शासकीय कर्मचा-यांना जरूर तो विकल्प देण्यासाठी 3 महिन्यांचा कालावधी देण्यात आला होता. दिनांक 6 नोव्हेंबर 1984 नंतर पदोन्नत होणा-या कर्मचा-यांना त्यांच्या पदोन्नतीच्या दिनांकापासून एक महिन्याच्या कालावधीच्या आत आता असा विकल्प द्यावयाचा आहे. शासन निर्णय, वित्त विभाग, दिनांक 15 ऑक्टोबर 1985 च्या परिच्छेद 3 मध्ये, कर्मचा-यांच्या पदोन्नतीचे आदेश काढताना त्या आदेशामध्येच संबंधित कर्मचा-यानें वेतननिश्चिती संबंधीचा आपला विकल्प पदोन्नतीच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत द्यावा व अशा प्रकारचा विकल्प न दिल्यास, वेतन-निश्चिती सरळ, महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम, 1981 मधील नियम 11 (1)(ए) खाली केली जाईल असा आणखी एक परिच्छेद न चुकता अंतर्भूत करण्यात यावा असे निदेश देण्यात आलेले आहेत.

शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, अद्यापही संबंधित कर्मचा-याच्या पदोन्नतीच्या आदेशामध्ये वेतन-निश्चिती करण्यासंबंधीचा विकल्प देण्यासंबंधीचा वर विहित केलेला परिच्छेद अंतर्भूत केला जात नाही. यास्तव सर्व प्रशासकीय विभाग व त्यांच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुख यांना या परिपत्रकाद्वारे पुन:सूचित करण्यात येते की, त्यांनी संबंधित कर्मचा-यांना पदोन्नतीच्या आदेशात वरीलप्रमाणे विकल्प देण्याविषयीचा परिच्छेद न चुकता अंतर्भूत करण्याची दक्षता घ्यावी. या आदेशाची अंमलबजावणी न झाल्यास व संबंधित कर्मचा-यांनी असा विकल्प उशिरा सादर करण्याबाबत मागणी केल्यास त्यास मंजुरी दिली जाणार नाही याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

Stencil 66 2880

आस्थापना
14 FEB 1996

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

ल. पां. कालिबाग,